# सर्पदंश - दुष्परीणाम / उपाय



आपल्या विद्यालयात किंवा आपल्या घरात अथवा परिसरात किंवा कोठेही साप निघाल्यास काय करावे....? तसेच काय करु नये ?

साप हा वन्यप्राणी कुठेही आढळु शकतो त्याच्या शरीराचे तापमान निश्चित नसते. त्यामुळे बदलत्या वातावरणानुसार सापाला सतत जागा बदलत फिरावे लागते. अंधारी व थंड जागा सापडल्यास तेथे काही काळाकरिता तेथे साप काही काळाकरिता मुक्काम करतो.

## साप आढळल्यास काय करु नये

१) आरडा ओरड करुन गर्दी जमा करु नये. २)सापाला मारण्याचा प्रयत्न करु नका. ३) कपडे जाळुन धुर करु नका.
४) सापावर रॉकेल, पेट्रोल, अथवा कोणतेही रसायन टाकण्याचा प्रयत्न करु नका. ५)सापाला इलेक्ट्रीक शॉक देण्याचा प्रयत्न करु नका.
६) सापांविषयी कोणतीही माहिती नसताना साप पकडण्याचा प्रयत्न करु नका.
७) उत्सुकतेपोटी सापाच्या अगदी जवळ जाऊन बघण्याचा प्रयत्न करु नका.
८) सापाला काडीने अथवा दगडाने त्रास देण्याचा प्रयत्न करु नका. ९) एकाच वेळी अनेक सर्पमित्रांना संपर्क करु नका. (सर्व सर्प मित्र आपले काम सोडुन त्वरीत येतात त्यांचीही वेळ महत्वाची आहे.)
१०) सर्पमित्राला संपर्क केल्यावर सापाला मारुच नका.
११) सर्प मित्रांची वाहने हवेवर किंवा पाण्यावर चालत नाही. तेव्हा कृपया पेट्रोलचा योग्य खर्च मिळणे अपेक्षित आहे.
१२) सर्पमित्राला शासनाकडुन कोणत्याही प्रकारचे मानधन किंवा मेहनताना मिळत नाही.

## साप आढळल्यास काय करावे.

१) साप जेथे असेल तेथे दुरुन बारीक लक्ष ठेवावे. २) नजिकच्या सर्प मित्राला त्वरीत संपर्क करावा.
३) सापाला सुरक्षित ठेवण्यासाठी बरणी/पिशवी/डबा आधीच तयार ठेवावे. ४) सर्प मित्राला योग्य सहकार्य करावे.
५) सर्प मित्र साप पकडत असताना कोणीही मध्ये मध्ये ढवळा-ढवळ करु नये.

## साप घरात येऊ नये यासाठी घेण्याची खबरदारी

१) निरुपयोगी सामान घरात सामान घरात जमा करुन ठेऊ नका. २) घराच्या आतील बाहेरील भिंतीच्या भेगा/छिद्रे ताबडतोब बुजवा.
३) घराच्या भिंतीला लागुन विटा-दगड-किंवा फरश्यांचे तुकडे जमा करुन ठेऊ नका.
४) संडास/बाथरुम/नाल्या यांना जाळ्या लावा. ५) घरातील पाली/उंदिर यांचा बंदोबस्त करावा.
६) घरातील खिडक्या दारांना बारीक जाळ्या लावा. ७)घराच्या बाहेरील बाजुंच्या दारांना उंबरठे लावावे.
८) सिंगल पल्यांच्या दारांना खालुन फट असते ती फट राहु नये याची खबरदारी घ्या. (स्पंज किंवा रेक्झीनची पट्टी लावा.)

## उंदरांचा उपद्रव टाळण्यासाठी

१) १०० मिली कार्बोलिक ॲसिड २)१०० मिली फिनाईल ३) १०० मिली गोमुत्र ४) १० लिटर पाणी
यांचे मिश्रण शाळेच्या, घराच्या, गोडाऊनच्या अडचणीच्या जागी फवारावे. या मिश्रणाचा प्रभाव १ महिना राहिल. पावसाळ्यात पाऊस आल्यास दर १५ दिवसांनी फवारावे. हे मिश्रण लहान मुलांपासुन दुर ठेवावे. आपल्या यवतमाळ जिल्ह्यात सर्व साधारणपणे २४ जातीचे साप आढळतात. त्यातील फक्त **१) नाग २) मण्यार ३) घोणस ४) फुरसे** हे चारच जातीचे साप विषारी आहेत.

## सर्प दंश झाल्यास घ्यावयाची खबरदारी

१) दंशग्रस्त व्यक्तिला धावपळ करु देऊ नये. २) दंशग्रस्त भगाची कमीत कमी हालचाल करावी.
३) दंशाच्या वरील भागावर पट्टी किंवा क्रेप बँडेज बांधावे. ४) चिरा मारण्याचे तंत्र माहित नसल्यास चिरा मारुच नये.
५) दंशाच्या जागेवर बर्फ लावावा. (तो भाग गोठवावा.) ६) दंशग्रस्ताला ताबडतोब नजिकच्या दवाखान्यात न्यावे. जिथे ASV (ॲन्टी स्नेक व्हेनम) उपलब्ध आहे. ७)कोणत्याही मंत्राने अथवा गावठी जडी बुटीने सापाचे विष उतरत नाही. तेव्हा लवकरच वैद्यकीय उपचार घेतल्यास दंशग्रस्त व्यक्ति १०० % वाचेल

**साप निघाल्यास संपर्क**

| | | | |
|---|---|---|---|
| आकाश पसले | ७८७५०२५०२८ (शास्त्री नगर) | राम त्रिवेदी | ९७६६१३९९९० (राणाप्रताप नगर) |
| [illegible] सरोद | ९४२१८८७७७५ (राधानगरी) | श्याम जोशी | ९९६०१५६८८६ (सिव्हील लाईन) |
| राजेंद्र कनाके | ९४२३३१७४५६ (लोहारा) | दिवाकर तिरमारे | ९५५२२२५०५१ (नारींगे नगर) |
| आकाश मडसे | ९७६६५४१२३२ (गणेश नगर) | लक्ष्मीकांत चव्हाण | ९९२१८६३७५० (लासिना) |
| विरेंद्र जोगळेकर | ९३२५३७८१८४ (बब्बी पहेलवान चौक) | सुमित बिडकर | ९४२३६८९९८८ (आर्णी रोड) |
| प्रशांत जैस्वाल | ९४[illegible]२१२१५०७ (सुयोग नगर) | कमलदास राठोड | ९४२००४८३२७ (समर्थवाडी) |
| गोपाल भोयर | ९४२३४३३६१५ (संदीप मंगलम् जवळ) | कु. मनिषा कोहाडे | ९५६१५३०५८३ (लक्ष्मी नगर) |
| मुकेश बोकडे | ९३२१९९४७३७ (अभिनव कॉलनी) | रोहण विनके | ९३२५७५६२३० (सिंघानिया नगर) |
| निलेश तलरेजा | ९३२६२४०८८८ (सिंधी कॅम्प) | चैतन्य जगताप | ७८७५१३७७७५ (राणाप्रताप गेट जवळ) |
| विशाल बावने | ९७६४८०५८६८ (वडगांव) | प्रथमेश देशमुख | ८९८३५२३६४३ (दत्तात्रय नगर) |
| हेमंत कापसे | ९२२६५८४९३७ (संदिप टॉकीज़) | साजिद खिलची | ९०४९३२५४५६ (पाटीपुरा) |